**Tarun Bharat (Monday, 13th August 2018 Page No. 10)**

# कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांतर्फे महिलांसाठी कार्यशाळा




**मळकर्णे : प्रशिक्षण शिबिरात सहभागी प्रशिक्षणार्थी महिलांसमवेत आमदार प्रसाद गावकर, सरपंच व विद्यार्थी.**

वार्ताहर
नेत्रावळी

मळकर्णे येथील महिलांना दुधापासून पनीर आणि पपईपासून जाम बनविण्याचे प्रशिक्षण नुकतेच सुलकर्णा येथील डॉन बॉस्को कृषी महाविद्यालयाच्या चतुर्थ वर्षातील विद्यार्थी गटाने दिले. या प्रशिक्षण कार्यक्रमाला सांगेचे आमदार प्रसाद गावकर खास उपस्थित होते. महिला गटांना स्वावलंबी बनविण्यासाठी उपयुक्त कार्यशाळा घेतल्याबद्दल आमदार गावकर यांनी विद्यार्थी तुकडीचे अभिनंदन केले.

कुशावती पिस्टन या नावाने या विद्यार्थी गटाला ओळखले जाते. सांगे हा कृषीप्रधान भाग असून कृषी उत्पादित मालावर प्रक्रिया करून आपले उत्पन्न वाढवावे. विद्यार्थी गट गावात जाऊन विविध प्रकारचे प्रशिक्षण वर्ग घेत आहेत. शेतकऱ्यांकडून माहिती मिळवून त्यांना प्रशिक्षित करायचे काम करीत आहे. महिलांनी अशा प्रशिक्षणाचा पुरेपूर लाभ घेऊन एखादा उद्योग सुरु करण्याचे आवाहन आमदार गावकर यांनी केले. उगेचे सरपंच संजय शिरोडकर, मळकर्णेचे पंचसदस्य संदेश गावकर, जुझे आल्फान्सो, सुरेखा जांबावलीकर उपस्थित होत्या. अक्षय परब यांनी सूत्रसंचालन केले. भूषण सावंत देसाई यांनी आभार मानले.